MHRG120002362024

<u>नियमित दिवाणी दावा क्र.११/२०२४</u>

प्रदिप नारायण दिवेकर व इतर
वि.
शंकर बाळू दिवेकर व इतर

**निशाणी क्र. ४९ कडील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दिला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दाव्याच्या सरनाम्यात पान क्र. २ वर वादी नं. ५ व त्याच्या पत्त्यानंतर वादी नं १ स्वत: करीता व नं.२ ते ५ करीता अखत्यारी ऐवजी संगणकीकृत टायपिंग चुकीमुळे ''वादी नं ५ स्वत: करीता व नं.६ ते ९'' करीता अखत्यारी असे चुकीने टायपिंग झाले आहे. त्यात दुरूस्ती करून वादी नं. ५ ऐवजी 'वादी क्र. १ व नं.६ ते ९ ऐवजी नं २ ते ५ '' अशी दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ने अर्जावरच म्हणणे सादर केले असून त्याने आक्षेप घेतला आहे की, वादीने यापूर्वी दिनांक २३.१०.२०२४ रोजी निशाणी २९ वर दावा दुरूस्तीसाठी अर्ज दाखल केला होता व तो मागे घेवून पुन्हा ०४.०७.२०५ रोजी निशाणी ४६ कडे नविन अर्ज दाखल केला. सदर अर्ज मंजूर होवून दावा दुरूस्तीसाठी प्रकरण प्रलंबीत असतांना पुन्हा नव्याने निशाणी ४९ वर अर्ज दाखल केला आहे. वादी गेले वर्षभर दावा दुरूस्तीकरीता नविन नविन र्ज दाखल करून् कोर्टाचा अमुल्य वेळ वाया घालवित आहे. सबब सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

३. उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकला.

४. दावा व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत दावा वाटपाकरिता दाखल करण्यात आला आहे. वादीने यापूर्वी निशाणी २९ कडे दाखल केलेला अर्ज मागे घेतला होता ही बाब विवादीत नाही. निशाणी ४६ कडील अर्जाव्दारे वादीने दाव्यात विहूर येथील गट नं.२१७ ही मिळकत दुरूस्तीव्दारे दाव्यात सामील केली आहे. प्रस्तुत अर्ज हा दाव्याच्या सरनाम्यात पान क्र. २ वर झालेल्या संगणकीकृत टायपिंगव्दारे झालेला चुकीचा

मजकूर दुरूस्तीबाबत आहे. दाव्याची अद्याप सुनावणी सुरू झालेली नसल्याने वादींचा अर्ज मंजूर करून प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादी क्र.१ चे काहीएक नुकसान होणार नाही. दावा दुरूस्तीनंतर प्रतिवादी क्र.१ ला त्याचा बचाव मांडण्यास संधी आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी दिल्यास दाव्याचे स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. करीता वादीचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या मतास मी पोहोचलो आहे. त्याचवेळी दाव्याच्या सुनावणीस झालेल्या विलंबाबाबत वादीने प्रतिवादी क्र.१ ला रू.५००/– रुपये खर्च देणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. वादीने प्रतिवादी क्र.१ ला रू.५००/– खर्च देण्याच्या अटीवर वादीचा अर्ज निशाणी ४९ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रामध्ये प्रस्तावित दुरुस्ती करावी व दुरुस्ती वाद पत्र सादर करावे.

GHANSHAM RAMLAL TIWARI

Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2025.11.04 11:00:02 +0530

(घनःशाम रा.तिवारी)

दिनांक : ०३–११–२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड